**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित नवघर, ता.वसई, जिल्हा- पालघर ते चिरनेर, ता.उरण, जिल्हा- रायगड (जेएनपीटी जवळ) पर्यंत टप्पा-१ (लांबी ८० किमी) बहुउद्देशिय मार्गिका (मल्टी मोडल कॉरीडॉर/ Multi Modal Corridor) विकसित करण्याच्या पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील बापाणे गाव ते नागले गाव (६.९ कि.मी लांब) बहुउद्देशिय मार्गिका (मल्टी मोडल कॉरीडॉर/ Multi Modal Corridor) विकसित करणेसंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्तांत**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित नवघर, ता.वसई, जिल्हा-पालघर ते चिरनेर, ता.उरण, जिल्हा- रायगड (जेएनपीटी जवळ) पर्यंत (लांबी ८० किमी) विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका (मल्टी मोडल कॉरीडॉर/ Multi Modal Corridor) विकसित करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता रॉयल गार्डन रिसोर्ट (सेंटर हॉल), मुंबई-अहमदाबाद हायवे, एनएच-८, ससुनवघर, नायगाव (पूर्व), तालुका- वसई, जिल्हा- पालघर-४०१२०८ येथे आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी ,पालघर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र.ई-११९, द्वारा पत्र क्र.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२११२१४-एफटीएस-०१६४ दिनांक १४-१२-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठीत केली:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, पालघर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | अध्यक्ष |
| २) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी-<br>प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे | सदस्य |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे- २<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे | आयोजक |

श्री प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, तारापूर १ तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री दिलीप गुट्टे, अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. राजेन्द्र राजपूत, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकाचे प्रतिनिधी,

पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ आणि ओमिक्रॉन संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधी देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधी मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविड-१९ आणि ओमिक्रॉन पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले, त्यानुसार प्रत्येक व्यक्तीचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या सभागृहाच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सुचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री प्रशांत गायकवाड यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित नवघर, तालुका- वसई, जिल्हा- पालघर ते चिरनेर, तालुका- उरण, जिल्हा- रायगड (जेएनपीटी जवळ) पर्यंत (८० कि.मी. लांब) बहुउद्देशिय मार्गिका (मल्टी मोडल कॉरीडॉर/Multi Modal Corridor) विकसित करण्याच्या पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील बापाने गाव ते नागले गाव (६.९ कि.मी लांब)बहुउद्देशिय मार्गिका (मल्टी मोडल कॉरीडोर/Multi Modal Corridor) विकास करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज दिनांक २०-०८-२०२१ रोजी प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग अ ७ (एफ) अंतर्गत येत असल्याने सदरहू प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे आघात त्यावरील सनियंत्रण व प्रस्तावित उपाययोजना याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व स्थानिकांनी केलेल्या सूचनांचा विचार करणे हा आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल विभाग, नवी दिल्ली यांच्या पर्यावरण मुल्यांकन समितीस ऑनलाईन ३ जून, २०१९ रोजी अर्ज केला आणि पर्यावरण मुल्यांकन समितीने २१७ व्या बैठकीत दिनांक २७ जून ,२०१९ रोजी यास प्राथमिक मान्यता (ToR) दिनांक १८ जुलै , २०१९ रोजी प्रदान केला. सदरहू प्रकल्प हा एमएमआरडीए ने एमएसआरडीसी कडे हस्तांतरित केल्यानंतर भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक १८ फेब्रुवारी ,२०२१ रोजी प्रकल्प प्रवर्तक बदलास मान्यता दिली.

वरील पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय ,ठाणे-२ म.प्र.नि. मंडळ, ठाणे यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत २५-११-२०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू सेक्रेटरीएट बिल्डींग, तळमजला, इस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१, मा.जिल्हाधिकारी कार्यालय- पालघर, मा.अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय- पालघर, मुख्य कार्यकारी अधिकारी- जिल्हा परिषद, पालघर, महाव्यवस्थापक- जिल्हा उद्योग केंद्र, पालघर ,तहसीलदार, तहसील कार्यालय वसई, जिल्हा-पालघर, ग्रामपंचायत कार्यालय- कामण, ससुनवघर,सरजामोरी, मोरी, पोमण, शिलोत्तर व नागले या सात संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, तालुका- वसई, जिल्हा- पालघर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई,मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे, उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे-२ ,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक अधिकारी, ठाणे-२, म.प्र.नि.मंडळ, ठाणे यांना एकही लेखी सूचना, तक्रार/आक्षेप प्राप्त झालेला नाही.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास, त्या लेखी स्वरुपात देऊ शकतात वा तोंडी स्वरुपात मांडू शकतात असे सांगितले. सदरहू सूचना/ आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित पर्यावरण, वने व जलवायू मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल.

अध्यक्षांच्या परवानगीने श्री. डी.एम. गोडबोले, अभियंता, लुईस बर्जर, पर्यावरणीय सल्लागार, म.रा.र.वि.महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी प्रकल्पा संदर्भात सादरीकरण केले. श्री. डी.एम. गोडबोले यांनी प्रस्तावित प्रकल्पाची आवश्यकता विषद करताना मुंबई महानगर प्रदेश हा वेगात वाढणारा नागरी प्रदेश असुन सध्या उपलब्ध असलेल्या सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर येणारा ताण तसेच झपाटयाने होणारे नागरीकरण यामुळे विरार-अलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पासारख्या सुविधा अत्यंत गरजेच्या असल्याचे अधोरेखित केले. सदर प्रस्तावाचे काम हे दोन टप्प्यामध्ये प्रस्तावित आहेत. टप्पा-१ नवघर ते बलावली अंदाजे लांबी ९८.५०० कि.मी., टप्पा-२ बलावली ते अलिबाग अंदाजे लांबी २९.९०० कि.मी.

म.रा.र.वि.महामंडळाने टप्पा-१ मधील नवघर ते चिरनेर यासाठी पर्यावरण मंजुरी व सीआरझेड मंजुरी प्राप्त करण्यासाठी प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी शासन निर्णय दि. ०६/०९/२०२१ अन्वये नवघर ते बलावली हा प्रकल्प म.रा.र.वि.महामंडळाकडे हस्तांतरीत झाल्यामुळे या प्रकल्पाकरीता महामंडळास प्रकल्प अंमलबजावणी संस्था व प्रकल्पाचे उद्योजक म्हणून मान्यता देण्यात आली आहे. तसेच म.रा.र.वि.महामंडळ यांना भुसंपादन करण्याकरीता निधी उपलब्ध करुन

देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जेएनपीटी, सिडको, एमआयडीसी, एमएचएआय यांचा सहभाग उपलब्ध करुन देण्यासाठी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठित करण्यात आली आहे.

सदरचा प्रकल्प हा ८० कि.मी. लांबीचा असुन हा पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यातील वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण या तालुक्यातील एकूण १०६ गावांमधुन प्रस्तावित आहे. त्यांनी पुढे असेही विषद केले की, प्रस्तावित मार्गिका ही जेएनपीटी, नवी मुंबई विमानतळ, मुंबई ट्रान्स हार्बरलींकला जोडणार आहे. तसेच विविध महामार्ग, एक्सप्रेसवे व राष्ट्रीय महामार्गासही जोडण्यासाठी नऊ ठिकाणी इंटरचेंज प्रस्तावित आहे. हा मार्ग शिघ्र संचार द्रुतगती महामार्ग असणार आहे.

त्यांनी पुढे असे विषद केले की, सदरच्या विरारअलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पामुळे वसई, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, पनवेल, उरण आणि तळोजा येथील औद्योगिक केंद्रांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल व शहरातंर्गत वाहतुकीमध्ये सुधारणा होईल. तसेच रोजगार निर्मिती, प्रदुषण नियंत्रण, इंधन बचत, वाहतुककोंडी यामुळे जिवनमान सुधारण्यास मदत होईल. सदर विरारअलिबाग बहुउद्देशिय मार्गिका प्रकल्पांतर्गत ठिकठिकाणी दुरध्वनी व्यवस्था, वाहन व ट्रक यांच्यासाठी स्वतंत्र वाहन तळ, रुग्णवाहीका, ठराविक अंतरावर प्रवासी सुविधा केंद्र, पेट्रोल, डिझेल, सीएनजी तसेच इलेक्ट्रिकल चार्जिंग सुविधा रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष संवर्धन, सौर पथदिवे, सीसीटीव्ही, वाहतुक व्यवस्था प्रणाली, अडथळा विरहीत पथकर नाके इ. सोयी प्रस्तावित आहेत.

सदरचा प्रकल्प हा वन विभाग, रेल्वे विभाग, शासकिय जमिनी, शेत जमिनी, पक्षी अभयारण्य, वन्य जीव अभयारण्य, खारफुटी क्षेत्र इ. क्षेत्रातुन जात आहे. यासाठी सर्व संबंधीत शासकीय प्राधिकरणांकडुन आवश्यक ती परवानगी घेण्यात येत आहे. तसेच बांधकाम कालावधीत सदरील मंजुरीच्या अटींचे पालन केले जाईल व भुसंपादनासाठी योग्य तो मोबदला देण्याची तरतुद करण्यात येत आहे. सदरच्या प्रकल्पासाठी एकूण अंदाजे १३४७ हेक्टर जमिन संपादित करावी लागणार आहे, त्यापैकी एकूण अंदाजे ७०० हेक्टर शेत जमिन आहे व एकूण अंदाजे २२४.२४ हेक्टर वनजमिनीपैकी ०९.०३ हेक्टर वनजमिन ही वसई तालुक्यामधील संपादित करावी लागणार आहे.

सदरचा प्रकल्प ज्या क्षेत्रातुन जात आहे तेथील जमिन, माती व पाण्याची गुणवत्ता याचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. बांधकामादरम्यान, बांधकाम वाहने व उपकरणांमुळे होणाऱ्या धुळ व वायु प्रदुषण संदर्भात सीपीसीबी च्या मानकांची पुर्तता करण्यात येईल,ध्वनी नियंत्रणासाठी दगडी भिंत, ध्वनी नियंत्रण यंत्रणा इ. सारखे संरक्षक उपाय योजले जातील. तसेच भुगर्भातील पाणी व इतर जलाशयातील पाण्याची तपासणी नियमित केली जाईल व त्याची गुणवत्ता राखली जाईल. पर्यावरण निरीक्षण व संरक्षणासाठी प्रकल्प प्रस्तावकाने सुमारे रु.१० कोटी रुपयाची आर्थिक तरतुद केलेली आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर उपस्थितांना पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी त्यांच्या सुचना, आक्षेप, टिकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. सुचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगण्याची सूचना केली.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार/ प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती/ शासनातर्फे प्राधिकृत केलेले भूसंपादन अधिकारी यांनी त्यांचे अभिप्राय दिले :-**

| अ.क्र | प्रश्नकर्त्यांचे नाव, पत्ता व व्यक्त केलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | **श्री. आत्माराम यशवंत ठाकरे- राहणार-पोमण, तालुका- वसई, जिल्हा:- पालघर:-**<br>(अ) या प्रकल्पामुळे अनेक गाव, पाडे, वस्ती हया बाधित होणार आहेत. येथे वनजमिनी आहेत. त्या वनजमिनीवर अनेक वर्षे येथील लोकांचे अतिक्रमण आहे. ती जमिन शासनाने त्यांच्या नावावर केलेली आहे. ती जमीन प्रकल्पासाठी अधिग्रहित केल्यास त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. तरी त्याचासुध्दा विचार करण्यात यावा. त्याचप्रमाणे त्या जमिनीची नोंद झालेली आहे. प्रकल्पात वन्यजमिनीचा कुठल्याही प्रकारे विचार करण्यात आलेला नाही. शासनाने त्यांना जमिनी दिलेल्या आहेत. त्यावर ते त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. याचा विचार शासनाने करावा. | **श्री. स्वप्नील तांगडे, उप विभागीय अधिकारी, वसई, तथा भूसंपादन अधिकारी** (अ) यांनी असे सांगितले की या प्रकल्पाबाबत ही जनसुनावणी होत आहे, याच्याअगोदरच्या दुस-या प्रकल्पांसाठी कार्यालयातच सूचना, प्रश्नांवर मार्ग काढत असत, ब-याच ठिकाणी यापूर्वी वाडवडिलांपासून शेतकरी शेतात काम करुनही त्यांची नावे सात बारावर येत नाही, त्यावेळी त्याच्याकडून कागदपत्र तयार करुन सातबा-यावर त्यांची नावे नोंदवण्यात आलेली आहेत. प्रत्येक गावात जाऊन सर्वेक्षण केलेले आहे. पंचनामे केलेले आहेत. कोणाचेही नुकसान होणार नाही याबाबत काळजी घेण्यात आलेली आहे. त्यांनी पुढे सांगितले की शेवटपर्यंत जमिनीचे स्टेटस हे शेवट केंद्र शासनाकडे असते,जर कोणाचे ७/१२ वर नाव नसेल, तर शासकीय नियम पाळून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, आपले कोणाचेही कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात येईल, तसेच त्यांनी जमिनीच्या मालकीबाबत संपूर्ण माहिती विस्तृतपणे समजावून सांगितली. |

| | | |
|---|---|---|
| | (ब) पोमण गावातील एका पाडयातून पंधरा घरे जातात. त्या जमिनीवर लावलेली फळझाडे व घरे बाधित होतात, त्याचा उल्लेख सादरीकरणात नाही. त्याचप्रमाणे आपल्या खात्याने त्यांना कुठल्याही प्रकारची नोटीस पाठवविलेली नाही. या प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. प्रकल्पाची आखणी करताना तेथील लोकांचा कुठल्याही प्रकारे विचार करण्यात आलेला नाही. तरी तेथील रहिवाशांचा विचार करण्यात येऊन त्यांना समाधान वाटेल, अशी योजना राबवून नंतरच जमिन ताब्यात घ्यावी. | (ब) त्यांनी आक्षेप नोंदविलेल्या पोमण गावातील पाडयामधील जमिनीची सद्यस्थिती काय आहे, हे माहित नाही तथापी त्याबाबत कोणाचेही नुकसान न होण्याची काळजी घेण्यात येईल असे आश्वासन दिले. त्यांना सांगितले की जमिन एकाची व बांधकाम दुस-याचे याबाबत छाननी करुन अशा केसेसना १४ लाख (चौदा लाख) रुपयांचा मोबदला यापूर्वी देण्यात आलेला आहे. |
| २. | <u>**श्री. रामचंद्र कृष्णा म्हात्रे, राहणार — बापाने गाव, तालुका- वसई, जिल्हा- पालघर:-**</u><br>(अ) त्यांनी सांगितले की माझ वैयक्तिक मत आहे की विकासासाठी सामाजिक प्रकल्पांना जमिन देण्यात यावी. मात्र त्याचा योग्य मोबदला त्वरित मिळत नाही, तो मिळण्याची मागणी केली. त्या मोबदल्यात त्यांना दुसरी जागा तेथे घेता आली पाहिजे. त्यांनी बापाने गावाचा सद्यस्थितीतील जमिनीचा भाव किती याबाबत विचारणा केली. | <u>**श्री. स्वप्नील तांगडे, उप विभागीय अधिकारी, वसई तथा भूसंपादन अधिकारी**</u> (अ) यांनी उत्तर देताना सांगितले की, ही पयावरणीय बैठक आहे. भूसंपादन कायदा, २०१३ नुसार प्रत्येक गावाचा जमिनीचा भाव ठरविला जातो. त्यासाठी रेडी रेकनर व मागील तीन वर्षांची खरेदी/विक्री याबाबत विचार करुन प्राथमिक दर त्या त्या गावाचा ठरविला जातो. ग्रामीण भागात बाजारभावाच्या चार पट दर दिला जातो. त्याचप्रमाणे बांधकाम, बोअरवेल, पाडे, फळबाग, विविध झाडे, बांधलेली विहीर याबाबत शासनाचे संबंधीत सक्षम प्राधिकारी (Competent Authority) त्यांच्या नियमांनुसार त्याचे मुल्यांकन (Valuation) ठरवितात. |
| | (ब) माझी ६३ गुंठे जागा ही हया ८ नंबरच्या रस्त्यासाठी (मुंबई- अहमदाबाद हायवे) बाधित झालेली आहे. तर प्रकल्पाच्या हद्दीपासून आम्ही आमची जागा विकसित करु शकतो काय? ती आम्हाला विकता येईल काय? | (ब) <u>**श्री. सुनिल देशमुख,अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ**</u> यांनी असे विषद केले की शासनाची वेगवेगळी विकास प्राधिकरणे/ यंत्रणा आहेत त्यांच्या त्यांच्या नियमानुसार त्याबाबत परवानगी देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | (क) सर्व विभागाचे निर्देश असले, तरी शेतक-यास योग्य तो मोबदला मिळत नाही. त्यांनी परत सांगितले की मोबदला चांगला मिळाल्यास आम्ही दुसरीकडे जागा घेऊन घरे उभारु. श्री म्हात्रे यांनी आपल्या सूचना आक्षेप नोंदविण्यासाठी ४५ दिवसाची मुदत देण्याची मागणी केली. | (क) **श्री. स्वप्नील तांगडे, उप विभागीय अधिकारी, वसई तथा भूसंपादन अधिकारी** आजची बैठक ही प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे पर्यावरणीय आघात कमी करण्यासाठी व त्यावर पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी आहे. भूसंपादन कायदा २०१३ हा पारदर्शक असून दर कसे ठरतात याबाबत त्यांनी पूनश्च: उपस्थितांना माहिती सांगितली. |

आयोजक, यांनी ही बैठक पर्यावरणविषयक असून प्रस्तावित प्रकल्पाबाबत अद्यापही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याबाबत पुनश्च: आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नसल्यामुळे त्यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांना दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अध्यक्ष पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की नियमांनुसार ३० दिवस अगोदर वृत्तपत्रात सदरहू प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे येथे उपस्थित करण्यात आलेले आक्षेप, सूचना यांची नोंद घेण्यात आलेली आहे. मात्र ज्यांना कोणालाही लेखी सूचना, आक्षेप नोंदवायचे असतील, त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ठाणे कार्यालयात ते नोंदविण्यात यावेत. तसेच बैठकीस स्थानिक लोकांनी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानून अध्यक्षांनी जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून सदरहू जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

(प्रशांत गायकवाड),
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर १
म.प्र.नि.मंडळ, तारापूर

(डॉ.राजेन्द्र राजपूत)
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ, ठाणे

(दिलीप गुट्टे)
अध्यक्ष
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पालघर, जि.पालघर